पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १३

**सभावृत्तांत**

दिनांक - **१७/०१/२०१९** वेळ - दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षीक सभा **गुरुवार** दिनांक **१७/०१/२०१९** रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.बाबर शर्मिला राजू - उपसभापती
३. मा.बुर्डे सुवर्णा विकास
४. मा.सोनवणे शारदा हिरेन
५. मा.तापकीर विनया प्रदीप(आबा)
६. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
७. मा.काळे उषा दिलीप
८. मा.अश्विनी गजानन चिंचवडे – पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.२) विद्यार्थांकरीता हस्ताक्षर सुधार प्रकल्प राबविणेबाबत. - मा.शर्मिला बाबर , मा.अश्विनी चिंचवडे-पाटील यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **०३/०१/२०१९** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक १२**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ४५ विषय क्रमांक – ०१
दिनांक - १७/०१/२०१९ विभाग – शिक्षण मंडळ कार्यालय
सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.शारदा सोनवणे
संदर्भ :- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र जा.क्र.शिमं/९अ/१८३/२०१८, दि.३१/१२/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळ कार्यालयाकडील प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देणेकामी दरवर्षी क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात. यामध्ये चार गटांमध्ये (पिंपरी, चिंचवड, भोसरी आणि सांगवी) स्पर्धा घेणेत येतात. शिक्षण विभागाकडील शालेय स्पर्धेचे आयोजन करणेकामी चारही विभागीय पर्यवेक्षकांना प्रत्येकी र.रू. पंचेचाळीस हजार अग्रिम असे एकूण र.रू.१,८०,०००/- (अक्षरी र.रु.एक लक्ष ऐंशी हजार फक्त) अग्रिम देणेत येणार आहे. त्यातून होणा-या स्पर्धेचा खर्च भागविणेत

येणार आहे. विभागीय पर्यवेक्षकांना अदा करावयाचे अग्रिम र.रू.१,८०,०००/- (अक्षरी र.रु.एक लक्ष ऐंशी हजार फक्त) व स्पर्धेकरिता होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – ४६ विषय क्रमांक – ०२

दिनांक - १७/०१/२०१९

सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.अश्विनी चिंचवडे-पाटील

संदर्भ :- मा.शर्मिला बाबर , मा.अश्विनी चिंचवडे-पाटील यांचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत सर्व प्राथमिक शाळांमध्ये सन २००६ ते सन २०१७ या कालावधीमध्ये हस्ताक्षर सुधार प्रकल्प राबविण्यात आला होता. सदर हस्ताक्षर सुधार प्रकल्प शिक्षण मंडळ बरखास्त झाल्यामुळे सन २०१७ ते सन २०१८ आदेश निर्गत केले नाही. शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या अभिप्रायानुसार सदर प्रकल्पाचा विद्यार्थ्यांना फायदा होत आहे. तरी सदरचा प्रकल्प पुन्हा सुरु करणेकामी मान्यता देणेत येत आहे. तसेच याकामी होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीसभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सोनाली दत्तात्रय गव्हाणे)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३२/२०१९
दिनांक : १८/०१/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.